CNR No. MHRG120000552021

नियमीत दिवाणी दावा क्र. ७/२०२१
जनार्दन वि. जनार्दन

**<u>निशाणी क्र. ११ कडील आदेश</u>**

प्रस्तुतचा वादीने क्रम १ नियम १० नुसार मयत प्रतिवादी जनार्दन गोविंद नाकती यांच्या वारसांना दाव्यामध्ये समाविष्ठ करण्यासाठी दिला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, मयत प्रतिवादी जनार्दन गोविंद नाकती दिनांक २३/०६/२००० रोजी मयत झाले असून दाव्याचे समन्स प्रतिवादींच्या वारसांनी स्विकारुन मयत प्रतिवादीचे वारस न्यायालयात हजर झाल्यानंतर वादीस सदर बाब कळाली आहे. प्रस्तावित प्रतिवादी क्र. १/१ यांनी आपले म्हणणे दाखल करुन जनार्दन गोविंद नाकती यांचा मृत्यू दिनांक २३/०६/२००० रोजी झाला असून त्याचा वादीस माहिती होती. त्यामुळे त्यांनी प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी मागणी केली आहे. तसेच न्यायालय अर्ज मंजूर करण्याच्या मतास आल्यास वारसांना प्रत्येकी रुपये ५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच हजार मात्र) खर्च देण्याचा आदेश करण्यात यावा अशी मागणी केली आहे. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वाद पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते. दिनांक २९/०१/२०२१ रोजी दाखल झाला असून प्रतिवादी जनार्दन गोविंद नाकती दिनांक २३/०६/२००० रोजी मयत झाले आहे. समन्स तामील झाल्यानंतर प्रस्तावित प्रतिवादी क्र. १/१ यांनी निशाणी क्र. १० कडील पुरसिस द्वारे जनार्दन गोविंद् नाकती यांचा मृत्यू झाल्याचे कळवले आहे. त्यानुसार निशाणी क्र. २० कडील वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफीचा अर्ज सुध्दा मंजूर करण्यात आला

आहे. या सर्व कारणास्तव प्रस्तूतचा अर्ज मंजूर करून मयत प्रतिवादी जनार्दन गोविंद नाकती यांचे वारसांना पक्षकार म्हणून वाद पत्रामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे या मतास मी पोहोचलो आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो -

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रस्तूत आदेशापासून १४ दिवसाच्या आत वाद पत्रात दुरुस्ती करुन मयत प्रतिवादी जनार्दन गोविंद नाकती यांचे वारस क्र. १/१ ते १/४ यांना पक्षकार म्हणून वाद पत्रामध्ये सामील करावे आणि दुरुस्ती वाद पत्र सादर करावे.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)

दिनांक : ३०/०७/२०२२ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड